कनिष्ठ सहाय्यक या संवर्गातून वरिष्ठ सहाय्यक या पदावर स्पर्धा परिक्षेने पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांना जेष्ठतेचा मानीव दिनांक रद्द करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-२/६५२/२०२५
अहिल्यानगर दि.३०/०६/२०२५

वाचा - १. उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण-५०२३/सं.क्र.१६७/आस्था-१० दि.३१.१०.२०२३

२. या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-२/८०७/२०२४ दि.०१.१०.२०२४

३. अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण-३१२५/प्र.क्र.१३९/आस्था-८ दि.२१.०५.२०२५

४. ग्रामविकास विभाग,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.परीक्षा-१०८९/सीआर-२६४/८९/१३ दि.१८.१२.१९८९

५. ग्रामविकास विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.परीक्षा-२५०६/प्र.क्र.१५२१/आस्था-१० दि.०९.०९.२००७

कनिष्ठ सहायक,भांडार सहायक,भांडारपाल व कॉम्पुटर या पदावरील मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा घेण्यांत येतात. संदर्भ क्र.०१ अन्वये जिल्हा परिषद अतंर्गत वर्ग ३ च्या कनिष्ठ सहाय्यक संवर्गातून वरिष्ठ सहाय्यक या पदावर विभागीय स्पर्धा परिक्षेने उत्तीर्ण उमेदवारांच्या बाबतीत परिक्षेचा दुसरा दिवस हा उत्तीर्ण जेष्ठता दिनांक म्हणून धरणेत यावा असे कळविण्यांत आले आहे.

जिल्हा परिषद अहिल्यानगर अतंर्गत सन २००६ ते आजअखेर कनिष्ठ सहायक या संवर्गातून वरिष्ठ सहाय्यक या संवर्गात स्पर्धा परिक्षेने उत्तीर्ण झालेले कर्मचारी यांना स्पर्धा परिक्षा दिलेल्या दिनांकाचा दुसरा दिवस हा जेष्ठता दिनांक देणेबाबत संदर्भ क्र.०२ अन्वये आदेश निर्गमित करण्यांत आलेला आहे. त्याअनुशंगाने संदर्भ क्र.०२ अन्वये स्पर्धा परिक्षा समाप्त झालेचा लगतचा दुसरा दिवस मानीव दिनांक धरणेत आलेला आहे.

स्पर्धा परिक्षेतून उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांच्या सेवाजेष्ठता दिनांकाबाबत संदर्भ क्र.०४ व ०५ अन्वये स्वयंस्पष्ट तरतूदी दिलेल्या असल्याने संदर्भ क्र.०३ मध्ये नमुद दि.२४.०८.२०२३, दि.१०.१०.२०२३ व दि.३१.१०.२०२३ रोजीचे शासन स्तरावरुन देण्यांत आलेले पत्र रद्द करण्यांत आलेले आहेत.

ग्रामविकास विभाग,मुंबई यांचेकडील पत्र दि.३१.१०.२०२३ च्या पत्राच्या अनुशंगाने संदर्भ क्र.०२ निर्गमित करण्यांत आलेला होता. करिता या कार्यालयाकडील संदर्भ क्र.०२ अन्वये निर्गमित करण्यांत आलेला आदेश हा या आदेशान्वये रद्द करण्यांत येत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्यांचा संकेतांक क्रमांक ~~२०२५०५२९०८०१०२~~ असा आहे
२०२५०६३००८०११३

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 27-06-2025 19:57:43
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रती,

श्री./श्रीम.-----------------------------

व्दारा - संबंधित खातेप्रमुख यांच्यामार्फत, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रत - कार्यासन - आस्थापना - ३, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

२/- संदर्भ क्र.०२ अन्वये नमुद कर्मचारी यांना मानीव दिनांक मंजूर करण्यांत आलेला होता. करिता अंतिम जेष्ठता यादीकरिता शुध्दीपत्रक प्रसिध्द करणेत येऊन सेवाजेष्ठतेमध्ये आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी.

प्रत - गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) जिल्हा - अहिल्यानगर यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.